**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## माहिती अधिकाऱ्यांनी माहिती अधिकार कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी - कुलसचिव
## विद्यापीठात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त द्विदिवसीय प्रशिक्षण संपन्न

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व माहिती अधिकाऱ्यांनी माहिती अधिकार कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन कायद्याच्या अनुषंगाने नागरिकांना माहिती देण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले. आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त विद्यापीठात द्विदिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन विद्यापीठातील सर्व अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील कर्मचाऱ्यांसाठी संगणक केंद्रातील सभागृहात करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर माजी कुलसचिव तथा संगणक केंद्र प्रमुख डॉ.डी.के. जोशी व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलसचिव पुढे म्हणाले, माहितीचा अधिकार कायदा लागू होवून तेरा वर्षे पूर्ण होत आहेत. जास्तीतजास्त नागरिकांपर्यंत हा कायदा पोहोचावा आणि खऱ्याअर्थाने लोकशाही या देशामध्ये रुजावी, या उद्देशाने या कायद्याला विशेष महत्व आहे. प्रशासनात उत्तरदायित्व निर्माण करणे आणि पारदर्शकता आणणे, यासोबतच सार्वजनिक कामकाजातील भ्रष्टाचार कमी करणे, हा महत्वपूर्ण उद्देश या कायद्याचा असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठात सर्वच माहिती अधिकारी या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करतात. याशिवाय नागरिकांना कायद्याच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्नसुद्धा केल्या जातो. माहिती अधिकाऱ्यांनी सर्व नागरिकांना जास्तीतजास्त सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

द्विदिवसीय प्रशिक्षणामध्ये जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी विद्यापीठातील जवळपास सत्तर माहिती अधिकाऱ्यांना माहिती अधिकार कायद्याचे तसेच या कायद्याच्या अनुषंगाने शासनाचे सर्व परिपत्रक, याशिवाय माहिती आयुक्त, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयाविषयीची सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षण वर्गात सहभागींनी विचारलेल्या सर्वच प्रश्नांची समर्पक उत्तरे देवून माहिती अधिकार कायद्यातील कलमांची सुद्धा सविस्तर माहिती दिली. प्रशिक्षण वर्गाच्या आयोजनासाठी जनसंपर्क विभागातील अधीक्षक श्री ए.टी. जोशी यांचे मार्गदर्शनाखाली ओम जगताप, सौ. रजनी चपाटे, सुधीर देशमुख व विजय झाडे यांनी परिश्रम घेतलेत.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. २९/०९/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी